महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १७६ वा | दिनांक : १६/०४/२०२५ | वार : बुधवार


## संभाजी भिडेंना चावलेल्या कुत्र्याची एसआयटी चौकशी करा-विजय वडेट्टीवारांची उपरोधक मागणी



**मुंबई :** शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी उर्फ मनोहर भिडे यांच्यावर कुत्र्याने हल्ला केल्याची घटना समोर आली होती. या घटनेवरून विजय वडेट्टीवार आणि जितेंद्र आव्हाड यांनी उपरोधक टीका केली आहे. कुणाला चावावे हे कुत्र्याला कळले नाही याचे वाईट वाटते. संभाजी भिडे यांना चावणाऱ्या कुत्र्याची एसआयटी चौकशी करा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. तर महत्त्वाच्या माणसाला चावल्याशिवाय कुत्रे काही उचलले जात नाहीत, असा टोला जितेंद्र आव्हाड यांनी लगावला.

शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे गुरुजी यांच्यावर कुत्र्याने हल्ला केला. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना दोन इंजेक्शन दिले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. डॉक्टरांनी संभाजी भिडेंना विश्रांतीचा सल्ला दिला आहे. आता या घटनेवरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उपरोधिक टीका केली आहे.

कुत्र्याला कुठून दुर्बुद्धी सुचली...कुणाला चावावे हे कुत्र्याला कळले नाही याचे वाईट वाटते. आता कुठला कुत्रा पोलिस शोधत आहेत, याची माहिती अजून मिळालेली नाही, पण मी माहिती घेतो, असे विजय वडेट्टीवार म्हणाले. कुत्रा हा प्रामाणिक प्राणी असतो, मात्र या प्रामाणिक कुत्र्याने का असा राग धरला? यासंदर्भात खरंतर एसआयटी वैगरे लावून चौकशी केली पाहिजे, असे म्हणत विजय वडेट्टीवार यांनी उपरोधिक टोला लगावला आहे.

या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही भाष्य केले. माझ्या शहरातही कुत्रे खूप वाढले आहेत. आता कुणाला चावल्यानंतर ते सापडतील ते माहिती नाही. कुत्रा कुणाला चावल्याशिवाय, तोही महत्त्वाच्या माणसाला चावल्याशिवाय कुत्रे काही उचलले जात नाहीत. आता महत्त्वाच्या माणसाला ते चावावेत, अशी आपण देवाकडे प्रार्थना करूयात, म्हणजे सर्वसामान्यांना न्याय मिळेल. या सरकारमध्ये कुत्राही मोठ्या व्यक्तीला चावला तर पकडला जातो. सरकारची कार्य करण्याची पद्धत चांगली आहे, असा टोला जितेंद्र आव्हाड यांनी लगावला.

संभाजी भिडे सोमवारी रात्री सांगली येथील आपल्या एका धारकऱ्याकडे जेवणासाठी गेले होते. जेवणाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर ते आपल्या सहकाऱ्यांसोबत घरी परत येत होते. तेव्हा शहरातील माळी गल्ली भागात एका कुत्र्याने अचानक त्यांच्यावर हल्ला चढवत त्यांच्या डाव्या पायाचा चावा घेतला. या अनपेक्षित घटनेमुळे भिडेंसह त्यांच्या सोबतचे कार्यकर्तेही काही क्षण गांगारून गेले. त्यानंतर लगेचच त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले. संभाजी भिडेंना डॉक्टरकडून दोन इंजेक्शन देण्यात आली आहेत. सध्या संभाजी भिडेंची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांकडून विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे. संभाजी भिडेंना येत्या दोन दिवसात आणखी इंजेक्शन देण्यात येणार आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर या घटनेनंतर भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर आला. त्यानंतर सांगली महापालिका खडबडून जागी झाली आहे. महापालिकेने शहरातील विविध भागात मोकाट कुत्र्यांची धरपकड सुरू केली आहे. ज्या भागात संभाजी भिडे यांना कुत्र्याने चावा घेतला होता त्या परिसरात महापालिकेकडून कुत्रे पकडण्याची मोहीम राबवण्यात आली आहे.

## आधी म्हणाले अंबादास दानवे काड्या करतो आणि आता...



**छत्रपती संभाजीनगर :** येथे रविवारी शिवसेना ठाकरे गटाची बैठक बोलावण्यात आली होती. मात्र या बैठकीला माजी खासदार चंद्रकांत खैरे उपस्थित नव्हते. तसेच अंबादास दानवे यांनी आपल्याला बोलावलेच नाही, असा आरोप खैरे यांनी केला होता. तसेच अंबदास दानवे काड्या करत आहे, असे म्हणत चंद्रकांत खैरे यांनी आज मातोश्री गाठली होती. उद्धव ठाकरे यांच्या भेटीनंतर चंद्रकांत खैरे यांनी वाद मिटला असल्याचे स्पष्ट केले आहे.

मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा झाल्यानंतर चंद्रकांत खैरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना चंद्रकांत खैरे म्हणाले, उद्धव ठाकरे यांची भेट झाली असून कार्यक्रमासंदर्भात चर्चा झाली आहे. काही कार्यक्रम पक्षाकडून आखले जाणार आहेत, त्याबाबत त्यांच्याशी बोलणे झाले. तसेच पुढे बोलताना चंद्रकांत खैरे म्हणाले, अंबादास दानवे आणि माझा वाद केव्हाच मिटला आहे. यापुढे आम्ही दोघे मिळून एकत्र कार्यक्रम करणार आहोत. तो एकटा किंवा मी एकटा कार्यक्रम करणार नाही, सोबत म्हणून कार्यक्रम करणार आहोत. आज सुद्धा सेना भवनला बैठक आहे, त्यावेळी मी आणि अंबादास दानवे सोबत बैठकीला असणार आहोत, असेही खैरे यांनी स्पष्ट केले आहे.

चंद्रकांत खैरे पुढे म्हणाले, संभाजीनगरमधील मेळाव्याच्या कार्यक्रमाला मला निमंत्रण नव्हतं. शिवाय त्या मेळाव्याच्या दिवशी माझ्या समाजाचा कार्यक्रम आधीपासून ठरलेला होता, त्यासाठी मी तिकडे गेलो होतो. त्यामुळे मेळाव्याला जाऊ शकलो नाही. उद्धव ठाकरेंना मी सगळ्या गोष्टी सांगितल्या आणि आता वाद मिटलेला आहे. तसेच १५ जूनला उद्धव ठाकरे संभाजीनगर येथे शिवसेना भवनचे उद्घाटन करतील तसेच शिबिर सुद्धा घेतील, अशी माहिती चंद्रकांत खैरे यांनी दिली आहे.

चंद्रकांत खैरे मातोश्रीवर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी मुंबईला गेले आहेत. यावरून शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री संजय शिरसाट यांनी टीका केली आहे. मातोश्रीवर तुमचे ऐकले जाणार नाही, अडीच वर्षांपूर्वी आम्हीही त्यांना काही सांगायला गेलो होतो. काँग्रेस-राष्ट्रवादीची साथ सोडा, पण त्यांनी ऐकले नाही, शेवटी पक्ष फुटला.

## राज्यपालांच्या बंगल्यासाठी ४८ एकर जागा कशाला ? त्यांच्या निवसस्थानाची जागा शिवस्मारकासाठी द्या, उदयनराजे भोसलेंची मागणी



**सातारा :** उदयनराजे भोसले यांनी सातारा येथे पत्रकार परिषद घेत विविध मुद्दे मांडले. यावेळी बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मरकावरही भाष्य केले आहे. राज्यपालांच्या निवसस्थानासाठी ४८ एकर जागा ठेवली आहे, ती कशाला पाहिजे? राज्यपालांच्या निवासस्थानाची जागा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवस्मारकासाठी द्या, अशी मागणी उदयनराजे भोसले यांनी केली आहे. तसेच याबाबतची मागणी राज्य आणि केंद्राकडे केली असल्याची माहिती देखील उदयनराजे भोसले यांनी केली आहे.

उदयनराजे भोसले म्हणाले, ४८ एकर म्हणजे किती जागा झाली. त्यांना आठ एकर जागा पण खूप झाली. अरबी समुद्रात पुतळा बांधला तरी अनेक अडचणी निर्माण होतील. त्याच्या बाजूला ४८ एकर आहे. महापौरांच्या बंगल्याचे स्मारक झालेच ना. राज्यपालांना दुसरीकडे जागा बांधून द्या. कारण त्याच्यासारखा दुसरा स्पॉट नाही, असे म्हणत उदयनराजे भोसले यांनी राज्यपालांच्या बंगल्यासाठी ४८ एकर जागा कशाला, ती जागा शिवस्मारकाला द्या, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पुढे बोलताना उदयनराजे भोसले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि महापुरुषांचा अवमान होऊ नये, यासाठी कायदा या आधीच काँग्रेस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात व्हायला हवा होता. शिवसेनेच्या नावातच शिवाजी महाराजांचे शिव आहे. पण त्यांनीही केले नाही. आता कायदा होत आहे. ते काम माझ्याकडून होत आहे. हे माझ्या आयुष्यातील मोठे काम आहे.

दरम्यान, उदयनराजे भोसले यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अनेक मागण्या केल्या आहेत. त्यात राजधानी दिल्लीत देखील बुद्ध सर्किट जसे आहे तसे छत्रपती शिवाजी महाराज सर्किट व्हावे, अशी मागणी अमित शहा यांच्याकडे केली होती. तसेच दिल्लीत शिवाजी महाराजांचे स्मारकही व्हावे, अशीही मागणी उदयनराजे भोसले यांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ एप्रिल २०२५


## हेमलता पाटलांचा शिंदे गटाला रामराम



**नाशिक** : नाशिकच्या हेमलता पाटील यांनी शिवसेना शिंदे गटाला रामराम ठोकला आहे. हेमलता पाटील यांनी दीड महिन्यांपूर्वीच कॉंग्रेस प्रदेश प्रवक्ते पदाचा राजीनामा देत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. आता शिवसेना शिंदे गट सोडल्यानंतर सध्या कोणत्याही पक्षात जाणार नसल्याचा खुलासा केला आहे.

हेमलता पाटील यांनी एका व्हिडिओमधून त्यांची भूमिका मांडली आहे. हेमलता पाटील म्हणाल्या, मी गेल्या ३५ वर्षांपासून काँग्रेस पक्षामध्ये काम करत होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मी इच्छुक असताना मला उमेदवारी मिळाली नाही. म्हणून मी काँग्रेस पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला होता. त्यानंतर मी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता.

पुढे त्या म्हणाल्या, शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर गेल्या दीड महिन्यात मी या पक्षाला आणि पक्षामध्ये काम करताना योग्य तो न्याय देऊ शकत नाही. मी योग्य ते काम करू शकत नाही, अशी माझी स्वतःची प्रामाणिक भावना झाली. त्या भावनेला साक्षी ठेवून मी यानंतर या पक्षात काम करायचे नाही, असे ठरवले आहे. कारण एखाद्या पक्षात आपण काम करताना प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. त्या पक्षाला योग्य तो न्याय दिला पाहिजे. परंतु, तसा न्याय मी देऊ शकत नाही. त्यामुळे सध्या मी कुठल्याही पक्षात काम न करण्याचे ठरवले आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास हेमलता पाटील इच्छुक होत्या. मात्र महाविकास आघाडीत शिवसेना ठाकरे गटाला ही जागा गेली. शिवसेना ठाकरे गटाने माजी आमदार वसंत गीते यांना संधी दिली होती. त्यानंतर हेमलता पाटील नाराज झाल्या होत्या. अनेक वर्ष कॉंग्रेस पक्षात एकनिष्ठ राहून देखील आपल्यावर अन्याय झाल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली होती व एकमेकांच्या कापाकापीतच पक्षाचे नेते मशगूल असल्याचा आरोपही हेमलता पाटील यांनी केला होता.

## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेत डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**छत्रपती संभाजीनगर** : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी छ.संभाजीनगर शाळेत घटना समितीचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री. चौधरी सर, प्रमुख पाहुणे श्रीमती सुनीता पाटील मॅडम, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते

## वर्ग मित्रांसाठी एक दिवस




**शिऊर** : जि. प. प्रशाला शिऊरच्या इयत्ता दहावीच्या सन १९८८ च्या वर्ग मित्रांनी १९८८ करिता १९८८ कडून आयोजित करण्यात आलेला भावस्पर्शी कार्यक्रम म्हणजेच स्नेहसंमेलन होय. तब्बल ३७ वर्षानंतर १५८ पैकी ७५ विद्यार्थ्यांनी एकत्र येत खूपच सुंदर कार्यक्रम घडवून आणला. बालपणीच्या आठवणींना उजाळा देण्याबरोबरच वयाची पन्नाशी पार करेपर्यंत जीवनात आलेल्या विविध अनुभवांचे कथन अनेकांनी केले. याप्रसंगी सर्वांना स्मृतीचिन्ह (ज्यावर जुनी शाळा आणि शिऊरचे श्रद्धास्थान श्री संत शंकरस्वामी यांचा फोटो आहे) आणि श्रीमदभगवद्गीता भेट देण्यात आली . शेवटी राष्ट्रगीतानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली .याप्रसंगी प्रतिष्ठित नेते, समाजसेवक, डॉक्टर, शिक्षक, व्यापारी, शेतकरी आणि विविध क्षेत्रातील वर्गमित्र उपस्थित होते.






## अमरनाथ यात्रेसाठी नोंदणी आजपासून सुरू

**श्रीनगर** : अमरनाथ यात्रा-२०२५ साठी नोंदणी आज (१५ एप्रिल) सुरू झाली आहे. भाविक ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही प्रकारे नोंदणी करू शकतात. नोंदणी शुल्क २२० रुपये ठेवण्यात आले आहे. ऑफलाइन नोंदणी ६०० हून अधिक बँकांमध्ये करता येते. यावर्षी अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होईल आणि ९ ऑगस्ट (रक्षाबंधन) पर्यंत (३९ दिवस) चालेल. हा प्रवास दोन मार्गांनी होईल - पहलगाम (अनंतनाग) आणि बालटाल (गंदरबल) मार्गांनी. यात्रेत सुमारे ६ लाख भाविक येऊ शकतात. ५ मार्च रोजी श्री अमरनाथ श्राइन बोर्डाच्या (एसएएसबी) ४८ व्या बैठकीत उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी यात्रेच्या तारखा जाहीर केल्या. भाविकांसाठी सुविधा सुधारण्यासाठी अनेक प्रस्तावांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. तीर्थयात्रा अधिक सुव्यवस्थित आणि सुरक्षित व्हावी यासाठी श्राइन बोर्डाने ई-केवायसी, आरएफआयडी कार्ड, ऑन-स्पॉट नोंदणी आणि इतर व्यवस्थांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. मंडळाचे म्हणणे आहे की गेल्या वेळीपेक्षा या वेळी जास्त यात्रेकरू यात्रेसाठी येऊ शकतात, हे लक्षात घेऊन, जम्मू, श्रीनगर, बालटाल, पहलगाम, नुनवान आणि पंथा चौक येथे राहण्याची आणि नोंदणीची व्यवस्था सुधारली जात आहे.

दणी दरम्यान आरोग्य तपासणी केली जात असल्याचे भक्त रोहितने सांगितले. तो म्हणाला की मी खूप उत्साहित आहे, ही माझी दुसरी अमरनाथ यात्रा आहे. सर्व प्रवाशांची आरोग्य तपासणी अनिवार्य आहे. दरम्यान, भक्त सोनिया मेहरा म्हणाल्या - ही माझी दुसरी यात्रा आहे, मला दरवर्षी या पवित्र यात्रेला जायचे आहे. या मार्गाने गुहेपर्यंत पोहोचण्यासाठी ३ दिवस लागतात, परंतु हा मार्ग सोपा आहे. प्रवासात कोणतीही तीव्र चढाई नाही. पहलगामहून पहिला थांबा चंदनवाडी आहे. ते बेस कॅम्पपासून १६ किमी अंतरावर आहे. येथून चढण सुरू होते. तीन किमी चढाईनंतर प्रवास पिसू टॉपवर पोहोचतो. येथून, यात्रा संध्याकाळी पायी चालत शेषनागला पोहोचते. हा प्रवास सुमारे ९ किमीचा आहे. दुसऱ्या दिवशी प्रवासी शेषनागहून पंचतारणीला जातात. हे शेषनागपासून सुमारे १४ किमी अंतरावर आहे. ही गुहा पंचतरणीपासून फक्त ६ किमी अंतरावर आहे. जर तुमच्याकडे कमी वेळ असेल तर बाबा बर्फानीचे दर्शन घेण्यासाठी बालटाल मार्ग हा सर्वात योग्य मार्ग आहे. त्यासाठी फक्त १४ किमी चढाई करावी लागते, पण ती खूप तीव्र चढाई आहे. त्यामुळे या मार्गावर वृद्धांना अडचणी येतात. या मार्गावरील रस्ते अरुंद आहेत आणि वळणे धोकादायक आहेत. २०२४ मध्ये, सलग दुसऱ्या वर्षी, भाविकांच्या संख्येत वाढ दिसून आली. २०२३ मध्ये ४.५ लाख आणि २०२४ मध्ये ५ लाख यात्रेकरूंनी दर्शन घेतले. २०१२ मध्ये, विक्रमी ६.३५ लाख यात्रेकरूंनी मंदिराला भेट दिली होती. २०२२ मध्ये कोविडमुळे हा आकडा कमी झाला होता आणि ३ लाख यात्रेकरू दर्शनासाठी आले होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ एप्रिल २०२५

# उजेड वाटेची शिवार पेरणी करणारी कविता




कवी ज्ञानेश्वर गायके यांचा पेरणी हा काव्यसंग्रह मिळाला.महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदान योजनेतून अतिशय देखणी दखल घेतली.कवितेचा पेरा अन् अक्षय अक्षराची पेरणी ज्ञानेश्वर गायके यांनी केली आहे.मुखपृष्ठ सुभाष कुदळे यांचे आहे.ख्यातनाम साहित्यिक डॉ.वासुदेव मुलाटे सरांनी अतिशय आशय संपन्न ग्रामीण कवितेचा आजच्या वास्तवाचा धोंडोळा घेतं ही नवंकवीची पीढी सजकतेने लिहिती झाली आहे.जे बोचते टोचते ती सल अस्सल होऊन ही कविता खपली धरते आहे.असा एकूण समाजाभिमुख आशावाद कवी ज्ञानेश्वर गायके यांची पेरणी या काव्यात आहे.जसे,"आता वाढल्या बाभळी काळ्या भूईत रे जरीनको करू खेद त्याचा वेळोवेळी सांगणारी अशी भेटली माणसं वादळाशी भिडणारी म्हणूनच सिध्द आता घेण्या गरूडभरारी "(शेवटची पिढी)कविता ही सविनय उर्मीतून मुक्त व्यक्त होण्याचे एक रूदन आहे.त्याला शब्द स्नेहाचं रिंगण भारलेपण गवसलं की तो गवसणी घालू लागतो शब्दाला.हे वेल्हाळपण म्हणजे आत्मिक अंतरंगी कवितेशी नातं आहे.तो जसा या कृषीवल संस्कृतीचा पाईक आहे तसा तो साहित्य वाचनं संस्कृतीचा ही सेवक होऊन जातो आहे.वाड्या रस्त्यातून गावकुसातून साहित्य वेशीतून नव्या मुसंडीचं नवं बियाणे घेऊन ही सृजन समर्पक पेरणी करणारी कविता.मक्तेदारीचा मक्ता या सर्वहारा साहित्यिकांनी मोडीत काढला.एक नवा आयाम देण्याचं काम ही पेरणी करते आहे.कुठल्यास्या गावं कोपऱ्यात गल्ली बोळीच ग्लोबल, ग्रेट ग्लॅमर आता कुणीही करू शकतो.पण सच्चीईची शब्द अक्षरांचे लेणे करत पेरणी केली की, त्याची उगवण ही दिमाखदार होते.ते ज्ञानेश्वर गायके यांनी केली आहे.तिफण परीवाराचे अनंत उपकार कवी स्नेहाळू भावनेतून ऋणाई व्यक्त करतो.तिफणकार शिवाजी हुसे पाठराखण मध्ये लिहितात,"कवी शब्दांची पेरणी करतांना आपल्या अक्षर वाटेवर स्वतःची नाममुद्रा उमटून आहेत.तिफणच्या अक्षर पेरणीतील एक बी हजारो दान्याना प्रसवत आहे.तिफणच्या चाड्यावर शब्दांची मुठ धरून समाजात सद्विचारांची पेरणी करीत हा कवी निघाला आहे." नितळ निर्लेप साधकाची पाठराखणं उभारी देते."माझ्या कवितेनं जावं, रोज फिरण्या रानात अन् वाऱ्याच्या कानात, सांगावं गुपिततिनं होऊन रे गाथा, ज्ञानेश्वरीस भेटावंइंद्रायणीत बुडून, कुणब्यास जगवावं"(माझ्या कवितेनं)कविता ही कवीची ओळख व्हावी.तशी पेरणी ही शिवर माथ्याची शब्द शेरणी आहे.मराठवाड्याच्या मातीचा मृदगंध घेऊन येणारी ही कविता हिरव्या फांदीला गच्च बिलगुन शब्द शिवार येतं.रानशिवराचा हळवा गारवा देऊन जाते.या कवितेने आजच्या ग्रामीण वास्तवाचे प्रखर चिंतन मांडले आहे.आज मायमातीची नाळ तुटते आहे.दावणीची बैलं गेली.पेरणी ही यंत्रवत झाली.बांधावरच्या गच्चपटात कव्हानचं मळणी झाली.सोयबीनची पोती मोंढ्या मधी गेली.गावगाड्याचं माल मातीचं मातेर होऊन गेलं.खळगुटीजगणं वाट्याला आलं. ही ठणक कवी व्यक्त करतो.सारचंनी सगळंच धस्कटं उमदळून आलं ही कविता हे धस्कटं तनकट उपटून फेकण्याची ही धमक दाखवते आहे.ही कविता त्या वेदनेनाचा रुमणपेच घेऊन येते.पेरणी केलीच पाहिजे.मायभूईची ओटी भरलीचं पाहिजे.ही कुणब्यांचीकविता जगण्याचा शिनवटा घालते.जसे,"आज करू या पेरणी,आला पाऊस हो छान.बळीराजा बाप माझा,जमा करीतो बियान.नका तुडवू रे रान,बाप विनवणी करेकेली आताचं पेरणी,कोंब वर येऊ द्या रे"(पेरणी)कष्टवंत बापाची आर्त हाक मनाला पिळवटून टाकते.ही बळीवंताच्या सर्वव्यापक वेदनेची तीव्रता करून देणारी कविता असल्याने आजच्या ग्रामीण गावं बदलतांना कवी म्हणून "बळीराजा बाप आमचा राब राब राबतांना अस्मानी संकटाशी सदा एकटा झुंजताना...पोशिंदा तो जगाचा उपाशीच राहतांना कर्जाला कंटाळून शेवटी जग आपले सोडतांना".(गावं बदलतांना)ही कविता वास्तवाचे खनपुट मनाला टोचणी करून देते.कवी ज्ञानेश्वर गायके यांची पेरणी एक दानेदार शब्द अक्षरांची पेरणी करणारी आहे. ग्रामीण बोलीशैलीचा वापर कमी असलातरी ती सुसंस्कृत विचारांची पेरणी करते कुठे ही अवजड बोजड शब्दांचा मोह नाही.अतिशय नितळ निर्लेप साधकाची ही कविता संयत मनोभूमिकेतून येते.या कवितेने नाती गोती आई बाबां गावं शिवाराचं नातं गुंफल्याचं गुणगान केले आहे.शिवार माथा उन्नत करतं ती."माय संस्कार शिदोरी,माय माझी रे माऊली.माय उन्हात तापली,देण्या लेकास सावली.माय खरं विद्यापीठ, माझ्यासाठी चारीवेद.माय ओळख जी माझी,गोड तुझा आशीर्वाद".(माय माझी) तसं गाव शिवाराच्या मायमातीत रांगलो, खेळला तीचे ही ऋण उल्लेख या कवितेने केला आहे.या मायबोली मळा मळणी,खळदळ, मातीचा लळा जीवाचा जिवडा होऊन जाताना,"या मातीने देता भाकर,जगण्या येथे लायक झालो.तिफण घेऊनी बीज पेरताजग पोशिंदा राजा झालो"(या मातीने)ही सद् विवेकी भावनेची पेरणी करीत ही कविता निघाली आहे.अस्सलगाव शिवाराचं गाणं मुक्त कंठाने गातं हे गावाचं पाखरु शब्दपंख लावून गावं शिवार कवेत घेऊन मुक्त पेरणी करीत ही सविनय कविता आशयघन अंगाने जाणारी आहे "साला मागून साल रे साल वनवास नित्य भाळीकधी कोरडा दुष्काळ अन् कधी अवकाळी जीव मातीत पेरतो इथं शेतकरी रोज अनमोल जिंदगाणी त्याची मातीमोल आज"(बोंड अळी)ही बळीवंताची वेदना कायमचं शेतीमातीशी घरोबा करून असल्याने शेतकऱ्यांचे हाल हे हलाहल प्राशन करून जगणचं वाट्याला आलं.असे प्रश्न मुखर करीत विवर दाखवणारी ही कविता उद्याचं भविष्य भाकित करते.कविता ही नेहमीच काळाचा अक्षर ईळा घेऊन विचारांची कणीस कापणी करते.कविता ही उजेड वाटेची खातरजमा करून पेरणी करते.कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या सार्थ काव्य वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**
**काव्यसंग्रह:-पेरणी -कवी ज्ञानेश्वर गायके, कन्नड, अनघा प्रकाशन, ठाणे (पुर्व)**
**मुखपृष्ठ :- श्री. सुभाष कुदळे प्रथमावृती १३ जानेवारी २०२५किंमत:-४८ रूपये**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ अनुदान**

# मान्सून जोरदार बरसणार : हवामान खात्याकडून गुड न्यूज



**नवी दिल्ली :** आयएमडी प्रमुख मृत्युंजय महापात्रा म्हणाले की, यावर्षी अल निनोची परिस्थिती निर्माण होणार नाही. सध्या देशाच्या अनेक भागात तीव्र उष्णता आहे. एप्रिल आणि जूनमध्ये उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची संख्या वाढेल. यामुळे पॉवर ग्रिडवर दबाव वाढेल आणि पाण्याची कमतरता निर्माण होईल. देशातील ५२% कृषी क्षेत्र मान्सूनवर अवलंबून आहे.

पावसाळ्यामुळे पाण्याच्या स्त्रोतांची कमतरता भरून निघते. वीजनिर्मितीसाठीही पाणी आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, सामान्य मान्सून हा मोठा दिलासा आहे. हवामानशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, आता मान्सूनमध्ये पावसाळी दिवसांची संख्या कमी होत आहे आणि मुसळधार पाऊस वाढत आहे. यामुळे वारंवार दुष्काळ आणि पूर येत आहेत.

अल निनो हा हवामानाचा नमुना आहे. यामध्ये समुद्राचे तापमान ३ ते ४ अंशांनी वाढते. त्याचा परिणाम १० वर्षांतून दोनदा होतो. त्याच्या प्रभावामुळे, जास्त पाऊस असलेल्या भागात कमी पाऊस पडतो आणि कमी पाऊस असलेल्या भागात जास्त पाऊस पडतो. अल निनोमुळे भारतात मान्सून अनेकदा कमकुवत असतो. ज्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण होते.

देशातील एकूण पावसापैकी ७०% पाऊस मान्सून हंगामात पडतो. देशातील ७०% ते ८०% शेतकरी पिकांच्या सिंचनासाठी पावसावर अवलंबून आहेत. याचा अर्थ असा की चांगला किंवा वाईट मान्सूनचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. जर मान्सून खराब असेल तर पिकांचे उत्पादन कमी होते, ज्यामुळे महागाई वाढू शकते.

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा वाटा सुमारे २०% आहे. त्याच वेळी, कृषी क्षेत्र देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला रोजगार प्रदान करते. चांगला पाऊस पडल्यास शेतीशी संबंधित लोकांना सणासुदीच्या आधी चांगले उत्पन्न मिळू शकते. यामुळे त्यांची खर्च करण्याची क्षमता वाढते, ज्यामुळे अर्थव्यवस्था मजबूत होते.

२०१९ ते २०२३ या ५ वर्षांत स्कायमेटचा अंदाज फक्त एकदाच खरा ठरला. स्कायमेटने २०२३ मध्ये ९४% पाऊस पडेल आणि त्या वर्षी तेवढाच पाऊस पडला, असा अंदाज वर्तवला होता. आयएमडीचा अंदाज २% कमी होता. २०२१ मध्ये, आयएमडीने ९८% पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली होती आणि जवळजवळ तेवढाच पाऊस (९९%) पडला होता. तर २०१९, २०२० आणि २०२२ मध्ये स्कायमेट आणि आयएमडीचा अंदाज प्रत्यक्ष पावसापेक्षा कमी-अधिक होता.

केंद्र सरकारच्या अर्थ सायन्स मंत्रालयाने २०२२ मध्ये देशातील सामान्य पावसाचा दीर्घकालीन सरासरी (LPA) अपडेट केला. त्यानुसार, ८७ सेमी पाऊस सामान्य मानला जातो. २०१८ मध्ये ते ८८ सेंटीमीटर होते. एलपीएमध्ये चार टक्के वाढ किंवा घट सामान्य मानली जाते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ एप्रिल २०२५


# भंडाऱ्याजवळ चारचाकीचा भीषण अपघात



**भंडारा :** येथील पाचगावजवळ भीषण अपघात झाला आहे. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. सोमवारी रात्री बाराच्या सुमारास हा अपघात झाला असल्याची माहिती समोर आली आहे. जखमींना तातडीने नागपूर येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या घटनेची अधिकची माहिती अशी, नातलगाकडील लग्नकार्य आटोपून नागपूरला परत जात असताना पाचगाव जवळील कुही फाट्यावर झालेल्या चारचाकीच्या अपघातात पत्नीचा जागीच मृत्यू झाला. तर पतीसह अन्य दोघे गंभीररीत्या जखमी झाल्याची घटना १४ एप्रिल, सोमवारी रात्री बारा वाजताच्या दरम्यान घडली आहे. अपघातग्रस्त भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर तालुक्यातील पिंपळगाव कोहळी येथील रहिवासी असून येथील कृष्णा फर्निचर मार्टचे मालक कृष्णा शेंडे यांची पत्नी नीलम कृष्णा शेंडे वय (26) हिचा जागीच मृत्यू झाला आहे. कृष्णा शेंडे त्यांची तीन वर्षाची मुलगी देवाशी तर साळा हेमंत असे तिघे गंभीर जखमी झाले असून त्यांना नागपूर येथील दवाखान्यात उपचारासाठी भरती करण्यात आले आहे.

कृष्णा शेंडे हा आपल्या परिवारासह त्यांच्या नागपूर येथील नातलगांच्या लग्नसभारंभास गेले होते. नागपूर येथून ब्रम्हपुरी येथे लग्नकार्य आटोपून सोमवारी रात्री परत नागपूरला स्वतःच्या चारचाकी वाहनाने जात असताना पाचगाव जवळील कुही फाट्यावरील उड्डाण पुलावर अचानक चारचाकी वाहन दुभाजकाला आदळल्याने पलटी मारली. यात कृष्णा शेंडे यांची पत्नी नीलम शेंडेचा जागीच मृत्यू झाला. तर स्वतः कृष्णा शेंडे अत्यंत गंभीर अवस्थेत असल्याची माहिती आहे. सदर घटनेची माहिती मिळताच अपघातग्रस्तांना नागपूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# पत्नीच्या गुप्तांगात हळद-कुंकू लावलेले लिंबू पिळले



**पुणे :** पत्नीने कोर्टात पोटगीचा दावा दाखल केल्यामुळे संतापलेल्या एका व्यक्तीने आपल्या पत्नीच्या गुप्तांगात हळद-कुंकू लावलेले लिंबू पिळल्याचा संतापजनक प्रकार पुणे जिल्ह्यात उजेडात आला आहे. ही घटना वर्षभरापूर्वी घडली. याविषयी ३६ वर्षीय पीडित महिलेने गत ११ तारखेला पोलिसांत फिर्याद दाखल केली. त्यानंतर हा प्रकार समोर आला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, फिर्यादी महिला व आरोपी पती यांचा २००४ मध्ये विवाह झाला होता. त्यांना २ मुले आहेत. लग्नानंतर काही वर्षांनी पतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांच्यात सातत्याने वाद होत होते. या वादाला कंटाळून पीडिता आपल्या दोन्ही मुलांना घेऊन बालेवाडी येथे राहण्यासाठी गेली. त्यानंतर आरोपी पतीही पिंपळे निलख परिसरात दुसऱ्या ठिकाणी राहण्यास गेला. पीडितेने नवऱ्याविरोधात पोटगीचा दावा दाखला. पण मधल्या काळात मुलांची शाळा सुरू झाली. त्यांची वह्या, पुस्तके नवऱ्याच्या घरीच राहिल्या होत्या. त्यामुळे ते आणण्यासाठी पीडिता पतीच्या घरी गेली.

त्यावेळी महिलेची आई, मामी व मुले ही सोसायटीच्या पार्किंगमध्ये थांबली होती. तर पत्नी वरच्या मजल्यावर असणाऱ्या फ्लॅटमध्ये साहित्य आणण्यासाठी गेली होती. त्यावेळी आरोपीने मद्यप्राशन केले होते. मुलांच्या शाळेच्या साहित्यासाठी आली आणि आमचे साहित्य घेऊन जाते काय? असे म्हणत आरोपीने पत्नीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. पण पतीने मद्यपान केले असल्यामुळे तिने त्याला फारसा प्रतिसाद दिला नाही. यामुळे संतापलेल्या पतीने मी बोलत असलो तरी माझ्याकडे पाहत नाही असे म्हणत घरातील कायता काढून पत्नीच्या गळ्यावर ठेवला.

त्यानंतर पत्नीला जबरदस्तीने कपडे काढायला लावले. तो एवढ्यावरच थांबला नाही. त्याने पत्नीच्या इच्छेविरोधात तिच्याशी शारिरीक संबंध प्रस्थापित करून हळद-कुंकू लावलेल्या लिंबाच्या ४ फोडी तिच्या गुप्तांगात पिळले. त्यानंतर मी तुझ्यावर जादूटोणा केली असून, तू आता वेडी होणार आहेस. हा प्रकार कुणाला सांगितला तर मी तुला ठार मारेन, अशी धमकीही त्याने पीडितेला दिली. त्यामुळे पीडित महिलेने ही गोष्ट कुणालाही सांगितली नाही. ती कुणालाही काही न बोलता आपल्या आई-मुलांसह आपल्या घरी गेली. त्यानंतर काही दिवसांनी तिने हा प्रकार आपल्या आई व मामीला सांगितला. त्यानंतर त्यांनी ११ एप्रिल रोजी सांगवी पोलिस ठाण्यात या प्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानंतर हा प्रकार उजेडात आला.

# महाराष्ट्राची कायदेशीर सहाय्यता कामगिरी निराशाजनक

**मुंबई :** इंडिया जस्टिस रिपोर्टने प्रसिद्ध केलेल्या २०२५ च्या अहवालानुसार, महाराष्ट्राला दहावे स्थान प्राप्त झाले आहे. २०२२ मध्ये महाराष्ट्र बाराव्या स्थानवार होता. कायदेशीर सहाय्यतेच्या निकषावरील क्रमवारीत राज्याची घसरण झाली असून १४ व्या स्थानावर गेले आहे, २०२२ साली ७ व्या स्थानावर होते. पोलिस यंत्रणेच्या कामगिरीबाबत मोठ्या व मध्यम आकाराच्या राज्यांमध्ये महाराष्ट्राला ५ वे स्थान प्राप्त झाले आहे, जे २०२२ मध्ये १० व्या स्थानी होते.

कर्नाटक राज्याने एकंदरीत क्रमवारीत प्रथम स्थान कायम ठेवले आहे. आंध्रप्रदेशने २०२२ मधील पाचव्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. तेलंगणाने २०२२ मधील तिसरे स्थान कायम राखले आहे. केरळ राज्य २०२२ मधील सहाव्या स्थानावरून चौथ्या स्थानावर आले आहे. तर छोट्या राज्यांमध्ये सिक्कीमने पहिले स्थान कायम राखले आहे, हिमाचल प्रदेश आणि अरुणाचल प्रदेशचा क्रमांक लागला आहे.

दरम्यान, मोठ्या व मध्यम आकाराची राज्ये म्हणजे १ कोटीहून अधिक लोकसंख्या असलेली राज्ये. तर छोटी राज्ये म्हणजे १ कोटींहून कमी लोकसंख्या असलेले राज्य. इंडिया जस्टिस रिपोर्ट अहवाल टाटा ट्रस्टने सर्वप्रथम सुरू केला होता. आयजेआरचा अहवाल २०१९ साली सर्वप्रथम प्रसिद्ध करण्यात आली होती. सेंटर फॉर सोशल जस्टिस, कॉमन कॉज, कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स इनिशिएटिव, दक्ष, टिस-प्रयास, विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी आणि हाउ इंडिया लिव्ह्ज यांसह अन्य काही सहयोगींच्या सहयोगाने हे सर्वेक्षण केले जाते.

हा अहवाल २४ महिन्यांच्या संख्यात्मक संशोधनाच्या आधारे तयार करण्यात आलेल्या २०२५ च्या या अहवालात अपेक्षित सेवा प्रभाविरीत्या देण्याच्या दृष्टीने न्यायदान रचनांच्या सक्षमतेच्या निकषावर राज्यांच्या कामगिरीचे मापन केले आहे. अधिकारप्राप्त सरकारी स्रोतांकडून आलेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीच्या आधारे, एरवी विस्कळीत असलेली माहिती न्यायदानाच्या चार स्तंभांमध्ये एकत्रित केली जाते. हे चार स्तंभ म्हणजे पोलिस, न्यायव्यवस्था, कारागृहे व कायदेशीर सहाय्यता. प्रत्येक स्तंभाचे विश्लेषण आर्थिक तरतूद, मनुष्यबळ, कामाचा भार, वैविध्य, संरचना व प्रवाह (पाच वर्षांच्या कार्यकाळात सुधारणेचे उद्दिष्ट) या मुद्द्यांवर केले जाते.

निवृत्त न्यायमूर्ती मदन बी लोकुर या अहवलाविषयी चर्चा करताना म्हणाले, व्यक्तीचा न्यायप्रणालीशी सर्वप्रथम संबंध आल्यानंतर लगेचच या व्यवस्थेतील दंडात्मक प्रक्रिया सुरू होते. पोलिस ठाण्यांतील कर्मचारी, पॅरालीगल कार्यकर्ते व जिल्हा न्यायालये आदी कायदेशीर सहाय्यता प्रक्रियेतील कर्मचारी या न्यायदान प्रणालीतील पहिल्या फळीला सुसज्ज करण्यात व प्रशिक्षण देण्यात आपल्याला पूर्णपणे अपयश आल्यामुळे जनतेच्या विश्वासाला तडा गेला आहे. समताधारित न्यायाप्रती आपली वचनबद्धता या संस्थाच पूर्ण करू शकतात. आपल्या संपूर्ण न्यायव्यवस्थेचे बळ या महत्त्वपूर्ण पहिल्या संपर्कबिंदूंमध्ये एकवटलेले आहे. सुधारणांचे प्रमाण कमी आहे आणि संसाधनांकडे पुरेसे लक्ष न दिल्यामुळे सुधारणा झालेल्या नाहीत हे इंडिया जस्टिस रिपोर्टच्या चौथ्या आवृत्तीतून अधोरेखित होते. त्यामुळे न्यायाच्या प्रतिक्षेतील व्यक्तींवरील ओझे कायम राहते आणि ते ओझे न्याय पुरवण्याची जबाबदारी असलेल्या सरकारांवर येत नाही.

इंडिया जस्टिस रिपोर्टच्या मुख्य संपादक श्रीमती माया दारूवाला म्हणाल्या, भारत लोकशाहीच्या शंभर वर्षांच्या दिशेने जात असताना, न्यायव्यवस्थेत सुधारणा झाल्याखेरीज कायद्याच्या राज्याचे व समान हक्कांचे वचन देणे निरर्थक आहे. सुधारणांना पर्याय नसतो. त्या करणे अत्यावश्यक आहे. उत्तम संसाधनांनी सुसज्ज अशी प्रतिसादक्षम न्यायप्रणाली ही घटनात्मकदृष्ट्या अत्यावश्यक आहे. प्रत्येक नागरिकाला दैनंदिन वास्तव म्हणून अशा व्यवस्थेचा अनुभव घेता आला पाहिजे.